**<u>नियमित दिवाणी दावा क्र.  २०/२०२० मधील नि.क्र. ३४ वरील आदेश</u>**

**(CNR NO MHRG140000892020)**

१.		सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १/२ यांनी, त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा  आदेश रद्द करुन दाव्यास कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२.		वादीने सदर अर्जास म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १/२ यांचा दावा बोगम व बिनबुडाचा आहे, केवळ दावा चालविण्यासाठी विलंब व्हावा या हेतुने प्रतिवादीने कैफियत दाखल केलेले नाही. प्रतिवादी क्र. १/२ यांनी कैफियत व म्हणणे का दाखल करु शकलेले नाही याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३.		अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४.		न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट कायदा १९६३ प्रमाणे कायदेशीर तरतूदींची पुर्तता करुन मिळणेकरीता दाखल केला आहे.  प्रतिवादी क्र. १/२ यांचे असे कथन आहे की, ते दिनांक ०७.०२.२०२० रोजीचे सुमारास समन्सची बजावणी झालेनंतर प्रतिवादी हे दाव्याच्या कामी हजर झाले नसल्याने त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेले आहे

५.		सदर प्रतिवादी क्र. १/२ हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करणार असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. सदर प्रतिवादी क्र. १/२  हे दाव्याचे कामी मुदतीत हजर होवून त्यांची कैफियत मुदतीमध्ये दिली नसल्यामुळे जो असोईस्करपणा झाला त्याकरीता प्रतिवादी क्र. १/२ यांस खर्च लावून

त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी क्र. १/२ यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – २१.०६.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.